# लातूर जिल्ह्यातील दुष्काळ निवारण्यासाठी केलेल्या उपाय योजना : एक अभ्यास

**संशोधक**
**पाटील सचिन मोहनराव**

**मार्गदर्शक**
**डॉ. एल. एच. पाटील**
अर्थशास्त्र विभागप्रमुख
शिवाजी महाविद्यालय, उदगीर
ता. उदगीर जि. लातूर

**प्रस्तावना**

दुष्काळ हा अलीकडील काळातील समस्या नसून ती प्रचीन काळापासून चालत आलेली समस्या आहे. प्राचीन काळी दुष्काळ निर्मूलनाच्या कायमस्वरूपी उपाययोजना दिसून येत नाहीत. तरीसुद्धा त्याकाळात काही राजे महाराजांनी आपल्या स्तरावर प्रयत्न करून दुष्काळात जनतेला मदत करून दुष्काळाची तीव्रता कमी करण्याचे प्रयत्न केल्याचे दिसून येतात. प्राचीन काळापासून संपूर्ण अर्थव्यवस्था शेतीवर अवलंबून असल्याने दुष्काळाचा सर्वात जास्त परिणाम शेतीवर होत होता. अशावेळी राजे महाराजे शेतकऱ्यांना बी, बियाणे आणि शेती उपयोगी साहित्याचा पुरवठा करून शेती सुरळीत करण्यासाठी प्रयत्न केल्याचे दिसून येते. दुष्काळात त्रस्त झालेल्या प्रजेला उपाययोजनांचा भाग म्हणून राजाकडून धान्याच्या स्वरूपात मदत दिली जात होती. मध्ययुगात दुष्काळात राजाकडून जनतेला धान्याचे वाटप केले जात होते. कठीण परिस्थितीत अन्नछत्रे उघडून गोरगरीब लोकांना जागविण्याचे प्रयत्न होत. "१३९६ मध्ये सुलतान महमदने १०,००० बैलगाड्यांचा ताफा ठेवून माळवा प्रांतातून बहामनी राज्यात धान्य आणले होते." सामान्य जनतेसाठी दुष्काळात केंद्रीय सत्तेकडून पिण्याच्या पाण्याच्या सोयी, अन्नधान्याचा पुरवठा, गुरांसाठी चारा उपलब्ध करून दुष्काळात लोकांना मदत केली जाई. सारा माफ करून लोकांना दिलासा दिला जात. दुष्काळात लोकांना काम मिळावे म्हणून रस्ते आणि महालांची बांधकामे सुरू करीत. मध्ययुगात १५५६ ते १६०३ या कालखंडात सम्राट अकबराच्या काळात पडलेल्या दुष्काळात प्रजेला दिलासा देवून त्यांचे जगणे सुसह्य करण्यासाठी सम्राट अकबराने किल्हे बांधून, तळी खोदून, सैन्य भरती करून लोकांना रोजगार उपलब्ध करून दिला होता. तर हाच वारसा पुढे चालवीत १६२१-३२ च्या दुष्काळात शहाजहानने निवारागृहे सुरू केली. गरीब जनतेला अन्नधान्य व पैशाचे वाटप केले आणि जनतेवरील सर्व प्रकारचे कर या दोन वर्षासाठी माफ केले.

दिल्ली- आग्रा प्रदेशातील १६६१ च्या दुष्काळात औरंगजेब स्वतः दुष्काळ निवारण करण्यासाठी प्रयत्न करीत होता. दुष्काळ निवारणासाठी आपला खजिना खुला करून त्याने पंजाब व बंगालमधून मोठ्या प्रमाणावर धान्य आयात केले. जनतेला ते अत्यंत कमी दरात दिले जाई. ज्यांना धान्य विकत घेणेदेखील शक्य नव्हते अशांना ते मोफत वाटले." यावरून असे दिसते की, मध्ययुगात पडलेल्या दुष्काळात मुस्लिम शासक सुद्धा सहिष्णू वृत्तीने वागल्याचे दिसून येते. औरंगजेबासारखा कडवा शासकही या काळात अत्यंत जबाबदारीने वागल्याचे दिसते. "महाराष्ट्रातही १७९२ च्या दोजीबारा दुष्काळात पिके बुडाल्याने धान्याच्या किंमती ५-६ पटीने वाढल्या. परंतु पेशव्यांनी निजामाच्या राज्यातून धान्य आणून वाटल्याने अवर्षणाचे वर्ष असले तरी दुष्काळ जाचक बनला नाही." दुष्काळात लोकांच्या बरोबरच जनावरांना वाचविण्याचे प्रयत्न केले जाई. जनावरांसाठी चारा छावण्या उभारल्या जात. १७९२ साली पडलेल्या दुष्काळात उपाययोजनांचा भाग म्हणून अशा प्रकारच्या चारा छावण्या तासगाव, इस्लामपूर, विटा, खानापूर, वडूज, कोरेगाव, सातारा व कऱ्हाड या ठिकाणी उभारल्याचे उल्लेख आढळून येतात. दुष्काळ निवारण्याची आधुनिक पद्धत प्रथमच सर जॉन कॅम्बेल यांनी जाहीर केली. त्यांच्या मते, दुष्काळ

निवारण्याची सर्व जबाबदारी सरकारची आहे. त्यानुसार ब्रिटीश काळात "१८७८ मध्ये दुष्काळ विमानिधी निर्माण करण्यात आला व त्याकरिता केंद्र सरकारने १.५ कोटी रु. रक्कम देऊ केली. हा निधी टिकून राहावा म्हणून सरकारने वेळोवेळी प्रयत्न केले." ब्रिटीश सरकारने दुष्काळ निर्मूलन धोरणाचा भाग म्हणून अनेक समित्या आणि आयोगाची स्थापना करून दुष्काळावर प्रभावी उपाययोजना करण्याचा प्रयत्न केला. दुष्काळ आयोगाची स्थापना हा याच उपाययोजनांचा भाग होता.

सीमांत व अल्पभूधारकांपूढील समास्यांची व्याप्ती लक्षात घेता शासनाची भूमिका नेहमी सकारात्मक राहिलेली आहे. सीमांत व अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी अनेकविध योजना शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविल्या जातात. अशाच पद्धतीने लातूर जिल्ह्यातील काही प्रमुख योजनांचा याठिकाणी घेतला आहे.

**संशोधन पद्धती**

सामाजिक शास्त्रामध्ये संशोधनाच्या अनेक पद्धती आहेत. प्रस्तुत संशोधनासाठी सामाजिक शास्त्रातील विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

प्रस्तुत संशोधनासाठी खालील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१. दुष्काळग्रस्त भागातील राबविल्या जाणाऱ्या योजनांचा अभ्यास करणे.

२. शासकीय योजनांमुळे शेतकऱ्यांच्या जीवनमानात सुधारणा झाली आहे का यांच्या अभ्यास करणे.

**राष्ट्रीय कृषी विमा योजना**

महाराष्ट्र राज्यातील शेती प्रामुख्याने कोरडवाहु असून सुमारे ८५ प्रतिशत क्षेत्र कोरडवाहु पिकाखाली येते. त्यामुळे राज्यातील बहुतांश शेतकऱ्यांची शेतजमीन मौसमी पावसावर अवलंबून आहे. मौसमी पाऊसाच्या लहरीपणामुळे बहुतेकवेळा शेती उत्पन्नात घट येते. शेती उत्पन्नात घट येऊन पीक कर्जाची परतफेड करू न शकल्याने शेतकरी थकबाकीदार होत असतो. त्यामुळे पत नाहीसी होऊन पुढील हंगामामध्ये निसर्गाने साथ दिली तरी पीक कर्जास अपात्र ठरून; भांडवलाअभावी पुन्हा शेती उत्पन्नात घट होऊन शेतकरी कर्जबाजारी होऊ लागले. या दुष्टचक्रातून शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी पीक विम्याची आवश्यकता भासू लागली. शेतकऱ्यांची मोठी संख्या व पीकाखालील क्षेत्रांचा प्रचंड पसारा यामुळे वैयक्तिक पातळीवर पीक विमा संरक्षण देणे शक्य नव्हते. यातून मार्ग काढण्यासाठी क्षेत्र घटक धरून पीक विमा योजना राबविण्याचा निर्णय झाला.[८]

सन १९८२ मध्ये पथदर्शक तत्त्वावर काही मोजक्या पिकावर व तालूक्यात पीक विमा योजना राबविण्यात आली. सन १९८५ मध्ये योजनेची व्याप्ती वाढवून सर्व प्रमुख खरीप व रब्बी पीकांसाठी तालूका क्षेत्र धरून सर्वकष पीक विमा योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. सर्वकष पीक विमा योजना १९८५-८६ ते १९९९-२००० खरीप हंगामापर्यंत आंमलात होती. यानंतर या योजनेची व्यापकता वाढविण्याच्या दृष्टीने सर्वकष पीक विमा योजनेचे पीक कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांपुरते मर्यादित स्वरूप बदलून कर्जदार तसेच बिगर कर्जदार अशा सर्वच शेतकऱ्यांना सहभागी करून घेणारी राष्ट्रीय कृषी विमा योजना ही सुधारीत स्वरूपांत १९९९-२००० च्या रब्बी हंगामापासून राज्यात राबविण्यात येत आहे. यामध्ये विमा संरक्षित रक्कमेवरील मर्यादा (रू.१००००) रद्द करून पेरणी केलेल्या संपूर्ण क्षेत्राला विमा संरक्षण देण्याची तरतूद या राष्ट्रीय कृषी विमा योजनेत आहे.

**रोजगार हमी योजना**

ग्रामीण भागातील रोजगार नसलेल्या लहान शेतकरी, शेतमजूर, गरीब भूमिहीन यांच्यासाठी वर्षातील किमान ठराविक दिवस रोजगाराची हमी देणारी ही योजगार हमी योजना म्हणून ओळखली जाते. महाराष्ट्र शासनाने सुरू केलेल्या आणि प्रभावीपणे चालविलेल्या योजनांपैकी ही एक योजना आहे. या योजनेसाठी नोंदणी केलेल्यांना वर्षात एक ठराविक दिवस रोजगारासाठी कामे दिली जातात. त्याबदल्यात रोख रक्कम आणि अन्नधान्य अशा स्वरूपात रोजगार दिला जातो.

**योजनेची वैशिष्टये**

१. १८ वर्षावरील प्रत्येक ग्रामीण बेरोजगाराला कामाची हमी देण्यात आली आहे.
२. रोजगाराची हमी जिल्हा स्तरावर दिली आहे. मात्र रोजगार शक्यतो गावाच्या ८ कि.मी. परिसरात व पंचायत समिती क्षेत्रातच उपलब्ध होईल अशाप्रकारे नियोजन केले जाते.
३. या योजनेत अकुशल मजुरांचाच विचार केला असल्याने काम श्रमप्रधानच असावी लागते. लघुपाटबंधारे सामुहिक विहीरी खोदणे, मृदसंधारण व भूविकास, वृक्षारोपण, पाझर तलाव, डोंगराळ भागात रस्तोबांधणी व रस्ते विकास इत्यादी कामे या योजनेखाली केली जातात.
४. मजुरी दर आठवडयास दिली जाते. बऱ्याचदा मजुरीतून ठराविक रक्कम कापून त्या बदल्यात धान्य देण्यात येते.
५. कामावर अपघात होऊन कामगाराचा मृत्यू झाल्यास किंवा अपंग झाल्यास १०,००० रूपये अनुदान देण्यात येते.
६. नोंदणी अधिकाऱ्याकडे गाव नोंदणी केल्यानंतर १५ दिवसाच्या आत संबंधितास काम पुरविणे आवश्यक असते. जर शासन १५ दिवसाच्या आत रोजगार पुरवू शकले नाही तर ती व्यक्ति रोजगार हमी योजना फंडातून रूपये २ (दोन रू) या दराने बेरोजगार भत्ता मिळवण्यास पात्र ठरते.

**श्रमशक्तीद्वारे ग्रामविकास**

हे रोजगार हमी योजनेचे नवे स्वरूप आहे. गावाचा सर्वकष विकास साधता रोजगार उपलब्ध करून देणे हा या नव्या स्वरूपातील रोजगार हमी योजनेचा उद्देश आहे. यात गावातील अनुसूचित जाती-जमाती व अल्पभूधारक व सीमांत शेतकरी यांच्या शेतजमिनीवर संपूर्ण शासकीय खर्चाने प्राधान्याने वैयक्तिक लाभ देणारी कामे हाती घेतली जातात. या कामामध्ये फलोद्यान, वनशेती, विहीर खोदणे यासारख्या कामाचा अंतर्भाव असतो.

**शेतीमाल तारण कर्ज योजना**

शेतीमालाची हंगामात एकदम आवक वाढून भाव कोसळतात. अशा परिस्थितीत बिगर-नाशवंत शेतीमाल तारणात ठेवल्यास शेतकऱ्यांची आर्थिक नड भागते. तसेच काही कालावधीनंतर शेतमालाचे भाव वाढून त्यांचा फायदा होतो. कृषीपणन मंडळाद्वारे सन १९९० पासून ही योजना राबविण्यात येत आहे. शेतीमालाचे बाजारभाव कमी झाल्यास शेतकरी आपला माल बाजार समितीकडे तारणात ठेवून बाजारसमिती त्या मालावर ६ टक्के व्याजदराने १८० दिवसांच्या मुदतीकरिता कर्ज म्हणून शेतकऱ्यांला तात्काळ उपलब्ध करून देते. बाजार समित्यांनी शेतकऱ्यांना दिलेल्या कर्ज रकमेची प्रतिपूर्ती पणन मंडळातर्फे केली जाते. या योजनेअंतर्गत तूर, मूग, उडीद, सोयाबीन, धान, ज्वारी, बाजरी, मका, हरभरा या शेतीमालाचा समावेश करण्यात आला आहे. या शेतीमालाच्या त्या दिवसाच्या बाजारभावाच्या ७५ टक्के रक्कम तारण कर्ज म्हणून दिली जाते.[१] या योजनेच्या लाभासाठी

नजीकची कृषी उत्पन्न बाजारसमिती अथवा कृषीपनन मंडळाचे मुख्य अथवा विभागीय कार्यालयाशी संपर्क साधावा लागतो.

**कृषी विकास योजना आणि महाराष्ट्र रोजगार हमी योजनेअंतर्गत शेततळी योजना**

अकराव्या पंचवार्षिक योजनेत कृषी व संलग्न क्षेत्राचा विकास दर ४ टक्के गाठण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय कृषी विकास योजना राबविण्यात आली. या योजनेअंतर्गत कोरडवाहू कापूस पिकविणाऱ्या विदर्भ व मराठवाड्यातील १६ व खानदेशातील ५ अशा २१ कापूस उत्पादक जिल्ह्यात शेततळी बांधण्याचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

**लाभार्थी पात्रता**

१. शेतकऱ्यांकडे त्यांच्या नावावर कमीत कमी ०.६० हेक्टर जमिन असावी
२. यापूर्वी इतर योजनांच्या माध्यमातून विहीर किंवा इतर सिंचन सुविधा मंजुर केलेली नसावी.
३. लाभार्थी शेतकऱ्यांची जमीन शेततळयाकरीता तांत्रिकदृष्टया पात्र असणे आवश्यक राहील.

**नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना मदतीसाठी योजना**

हवामानातील अनियमितपणा, तापमानातील बदल, अतिवृष्टी, पूर, गारपीट, विजा पडणे, भूकंप इत्यादी विविध नैसर्गिक प्रकोपांना "नैसर्गिक आपत्ती" असे म्हटले जाते. शासन निर्णय दिं १६ जुलै १९८३ अन्वय अतिवृष्टी, पूर व गारपीट यामुळे पिकांचे नुकसान झालेल्या आपद्ग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने अर्थसाहाय्य देण्यासाठी कायमस्वरूपी योजना मंजूर केलेली आहे. दिनांक २३ जून १९९५ च्या स्थायी आदेशान्वये ५० प्रतिशतपेक्षा अधिक नुकसान झालेल्या शेती पिके व फळ पिकांच्या नुकसानाकरीता १००० रूपये प्रति हेक्टर याप्रमाणे २ हेक्टर मर्यादेपर्यंत आपद्ग्रस्त शेतकऱ्यांना मदत मंजूर करण्यात येते.

**पात्रतेचे निकष**

अतिवृष्टी, अवेळी पाऊस, पूर व गारपीट या नैसर्गिक आपत्तीमध्ये नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पुढील निकषानुसार मदत केली जाते-

१. ज्यांच्या पिकांचे ५० टक्क्याहून अधिक नुकसान झाले आहे, अशा आपद्ग्रस्त शेतकऱ्यांना प्रति हेक्टर १००० रूपये याप्रमाणे २ हेक्टर मयदिपर्यंत मदत केली जाते.
२. फळझाडे पडल्यास फळलागवडीसाठी रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग लागवड योजनेनुसार अनुदान रूपाने मदत दिली जाते.
३. ज्या फळझाडांना इजा झाल्यामुळे ५० टक्क्यांपेक्षा जास्त उत्पादनक्षमात कमी झाली आहे. अशा झाडांना पूनर्जीवित करण्यासाठी प्रति हेक्टर १००० रूपये याप्रमाणे खते, पीक संरक्षक फवारणी कार्यक्रम यासाठी वस्तुरूपाने मदत केली जाते.[११]

**मदतीचे स्वरूप**

रोख स्वरूपात / खताच्या स्वरूपात / बियाणे स्वरूपात, यापैकी शासन वेळोवेळी जे धोरण ठरवील त्याप्रमाणे मदतीचे स्वरूप राहील.

**राज्य पुरस्कृत पीकसंरक्षण योजना**

फळपिके व भाजीपाला पिकांवर कीड रोगांचा प्रादुर्भाव कमी जास्त प्रमाणात आढळुन येत असतो. त्यामुळे उत्पादनात घट आढळून येते. सदरच्या उत्पादनात घट होऊ नये आणि शेतकऱ्यांना फवारणी करण्यासाठी काही प्रमाणात मदत व्हावी या दृष्टिने फवारणी कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे. यामुळे उत्पादनात निश्चीत अशी वाढ होऊ शकेल. राज्य पुरस्कृत पीकसंरक्षण योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना त्यांच्या फळझाडावरील तसेच भाजीपाला पिकांवरील कीड/रोगांच्या नियंत्रणासाठी कीटकनाशके, बुरशीनाशके फवारणीसाठी औषधांच्या किंमतीवर ५० टक्के अनुदान दिल्या जाते.

या योजनेचा लाभ घेणारा लाभार्थी शक्यतो सीमांत व अल्पभूधारक असावा. तसचे अनुसूचित जाती/जमातीच्या शेतकऱ्यांना प्राधान्य देण्यात येईल. सदर योजना कृषी विकास अधिकाऱ्यांमाफत राबविली जाते.

**कृषी यांत्रिकीकरणाची योजना**

कृषी अभियांत्रिकीकरणास प्रोत्साहन देण्याकरिता शेतकऱ्यांना अनुदानावर ट्रॅक्टरचलित, स्वयंचलित, बैलचलित अवजारे वाटप करण्याची १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना सर्व जिल्ह्यात राबविण्यात येते. ही योजना कृषी विकास अधिकारी यांच्यामार्फत राबविली जात असून विविध सुधारित कृषी अवजारे पुरविण्याकरिता मंजूर केलेले अनुदानाचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | अ. कृषी अवजारे | अनुदानाची मर्यादा |
|---|---|---|
| १. | ट्रॅक्टर (केंद्र शासनाने मंजूर केलेले) | किमतीच्या २५ टक्के रू.४५०००/- मर्यादित |
| २. | पॉवर टिलर | किमतीच्या ४० टक्के रू.४५०००/- मर्यादित |
| ३. | स्वयंचलित रिपर व ट्रान्सप्लान्टर | किमतीच्या २५ टक्के रू.४००००/- मर्यादित |
| ४. | स्वयंचलित विशेष अश्वशक्तीवर चालणारी यंत्रे | किमतीच्या २५ टक्के रू.१५०००/- मर्यादित |
| ५. | मनुष्यचलित अवजारे/उपकरणे | किमतीच्या २५ टक्के रू.२०००/- मर्यादित |
| ६. | बैल/प्राणीचलित अवजारे | किमतीच्या २५ टक्के रू.२५००/- मर्यादित |
| ७. | अश्वशक्तीचजित अवजारे | किमतीच्या २५ टक्के रू.१००००/- मर्यादित |
| ८. | पॉवर थ्रेशर (सर्व प्रकारचे) | किमतीच्या २५ टक्के रू.१२०००/- मर्यादित |
| ९. | डिझेल/पेट्राल केरोसिन/विद्युत पंप संच | किमतीच्या ५० टक्के रू.१२०००/- मर्यादित |
| १०. | कोनोडिवर | किमतीच्या ५० टक्के रू.३०००/- मर्यादित |
| ११. | ट्रॅक्टरचलित स्प्रेपंप | किमतीच्या २५ टक्के रू.४०००/- मर्यादित |
| १२. | कम्बाईन हार्वेस्टर (शेतकरी/स्वयंसेवी संस्था/सहकारी संस्था) | किमतीच्या २५ टक्के रु.१,५०,०००/-मर्यादित |

**इंदिरा आवास योजना**

इंदिरा आवास योजना राज्यात एप्रिल १९८९ पासून ग्रामीण भागातील घरे नसलेल्या दारिद्र्यरेषेखालील कुटुंबासाठी घरे बांधण्यासाठी राबविले जाते. ही योजना केंद्र पुरस्कृत असून केंद्र व राज्याचा हिस्सा ७५:२५ असा आहे. या योजने अंतर्गत ६० टक्के लाभधारक अनुसूचिता जाती-जमातीमधील व उर्वरित ४० टक्के इतर वर्गातून निवडले जातात.

**घरांची रचना**

घराचे बांधकाम २५० चौ. फुट. करण्यात येते. घराचा दर्जा सुधारण्यासाठी संपूर्ण काम वाळू व सिमेंटमध्ये करण्यात येते. घरकुलामध्ये दोन खोल्या बांधण्यात येतात. लाभार्थी स्वतः खोल्या बांधू शकतो. परंतु या बांधकामावर पर्यवेक्षण केले जाते. केंद्र शासनाने १ एप्रिल २०१० पासुन घराच्या बांधकामाची किंमत प्रत्येकी ४५००० रूपये इतकी निश्चित केली आहे. तथापी राज्यशासनाने प्रत्येक घरांच्या बांधकामाच्या किमंत वाढवून ती ७०,००० रूपये इतकी केली असून बांधकामासाठी लागणारी वाढीव रक्कम राज्य शासनातर्फे पुरविण्यात येते.

**जीवनधारा व जवाहर विहीरी योजना**

'जीवनधारा' ही केंद्रपुरस्कृत योजना राज्यात १९८८-८९ पासून राबविण्यात येत आहे. या योजनेन्वये अनुसूचित जाती व जमातीमधील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतांमध्ये विहीरी खोदण्यात येतात. पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने १९८८-८९ पासून राज्यात रोजगार हमी योजनेअंतर्गत राज्य शासनाने 'जवाहर विहीरी' ची योजना हाती घेतली असून ज्यांना 'जीवनधारा' योजनेचा लाभ मिळू शकत नाही, अशा अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतात विहीर बांधून देण्यात येते.

**कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून कृषी विस्तार**

कृषी प्रदर्शनाद्वारे कृषी तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यासाठी राष्ट्रीय, राज्य, जिल्हा तसेच महत्त्वाचा गावांच्या यात्रेच्या ठिकाणी प्रदर्शनाचे आयोजन करणे, गरजेनुसार प्रदर्शन साहित्य निर्मीती करणे इत्यादी बाबींचा समावेश या योजनेत करण्यात आला आहे. ही योजना १०० प्रतिशत केंद्रशासन पुरस्कृत आहे. राज्यातील निरनिराळ्या पिंकाचे उत्पादन व उत्पादकता वाढविण्यासाठी आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी कृषी प्रदर्शने हे एक प्रभावी विस्तार माध्यम आहे. राज्यातील महत्त्वाच्या यात्रांच्या ठिकाणी, जिल्हा विभाग स्तर, तसेच राज्य व देश पातळीवर कृषी प्रदर्शने भरविणे, विविध कृषी तंत्रज्ञानावरील मॉडेल्स, ट्रान्सलाईट, फोटो, ब्लो-उप्स (लॅमिनेशन्स), पॅनल्स इत्यादि प्रदर्शन साहित्याची निर्मीती करणे, विविध स्तरावर कृषी प्रदर्शनाचे आयोजन करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

**सिंचन व उपसा जलसिंचन योजना**

उद्देश :- जिराईत शेती बागायती करण्यासाठी, जुन्या योजना / नवीन करणे, क्षारपड जमीन सुधारणा इ. साठी अर्थसाहाय्य.

पात्रता :- अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी ही योजना राबविण्यात येते.

कर्जमर्यादाः- प्रकल्प किंमतीच्या ९० टक्के पर्यंत.

वैशिष्टयेः नवी / जुनी विहीर खोदाई, शेततळी, पाणी साठवण हौद, बोअरवेल इलेक्ट्रीक मोटार, मोटर/डिझेल पंपसेट, पाईपलाईन, ठिबक व तुषार सिंचन, क्षारपड जमीन सुधारणा इत्यादीसाठी अर्थसाहाय्य देण्यात येते.

**पशुसंवर्धन खात्यामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या राज्य व केंद्र पुरस्कृत योजना**

**विशेष पशुधन उत्पादकता कार्यक्रम**

या कार्यक्रमा अंतर्गत संकरीत कालवडी व सुधारित म्हशींच्या पारडूयांच्या जोपासनेकरिता ४ ते ४० महिन्यापर्यंत पशुखाद्याचा पुरवठा करण्यात येतो. यामध्ये सीमांत व अल्पभूधारक शेतकरी यांना ५० टक्के अनुदानावर पशुखाद्याचा पुरवठा करण्यात येतो. तसेच सीमांत व अल्पभुधारक शेतकऱ्यांना कालवडीच्या संगोपनाबाबत तीन दिवसाचे प्रशिक्षण देण्यात येते.

**विशेष घटक योजनेअंतर्गत ५० टक्के अनुदानावर दुधाळ गटाच्या जनावरांचा पुरवठा**

सदरील योजनेत अनुसूचित जाती जमाती नवबौध्द शेतकरी लाभार्थ्यांना किमान पाच लाभार्थींच्या समुहास प्रति लाभार्थी तीन संकरित दुधाळ / म्हशी यांचा ५० टक्के अनुदानावर पुरवठा करण्यात येतो. वैरण विकास सीमांत व अल्पभूधारक शेतकऱ्यांकडील दुधाळ जनावरांना हीरवा चारा उपलब्धतेकरिता तसेच विविध वैरणविषयक पिकांची माहिती होण्याच्या दृष्टीने त्यांच्याकडील जमिनीवर वैरण विकासास प्रोत्साहन देण्याकरिता १०० टक्के अनुदानावर विविध प्रकारच्या वैरण बियांणाचे वाटप करण्यात येते. वरील योजनांव्यातिरिक्त पशुवैद्यकीय दवाखान्यांची स्थापना, पशुवैद्यकीय दवाखान्यांची दर्जा वाढ, ५० टक्के अनुदानावर शेळी गट पुरवठा सामुहिक प्रचार व प्रसिध्दी, विशेष घटक योजनाअंतर्गत प्रशिक्षण इत्यादी प्रकारच्या योजना पशुसंवर्धन खात्यामार्फत राबविण्यात येतात.

**सारांश**

प्रस्तुत प्रकरणात लातूर जिल्ह्यातील पडलेल्या दुष्काळावर उपाय योजना करण्यासाठी विविध नेमलेले दुष्काळ आयोग, लातूर जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी शासनाच्या विविध योजना, आणि पशुसंवर्धन खात्यामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या राज्य व केंद्र पुरस्कृत योजना राबविण्यात आल्या. परंतु प्रत्यक्षात काहीच योजनांचा फायदा शेतकऱ्यांना झालेला दिसून येतो.

**संदर्भ**

१. ब्रह्मे सुलभा, 'दुष्काळ लोकवैज्ञानिक नियोजनाचा', उ.नि.पृ.क्र. ०२.
२. देसाई दत्ता, महाराष्ट्रातील दुष्काळश, उ.नि. पृ.क्र. १२.
३. ब्रह्मे सुलभा, 'दुष्काळ लोकवैज्ञानिक नियोजनाचा', उ.नि. पृ.क्र. ०२.
४. मराठी कादंबरीतील दुष्काळाचे चित्रण रू एक अभ्यास (निवडक कादंबऱ्यांच्या संदर्भात)
५. संपा. लक्ष्मणशास्त्री, मराठी विश्वकोश, खंड ७ उ.नि.पृ.क.८३३
६. ढमढेरे एस.व्ही., महाराष्ट्रातील जलसंपदा' उ.नि.पृ.क.९१
७. प्रभु सुरेश, 'पाणी व्यवस्थापन हा राष्ट्रीय प्रश्न', दैनिक दिव्य मराठी, नाशिक आवृत्ती, बुध. २९ फेब्रुवारी २०१२, पृ.क.०४.
८. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई २००८-२००९ ते २०१२-१३.
९. भारताची आर्थिक पाहणी भारत सरकार, वित मंत्रालय, नवी दिल्ली, २००८-२००९ ते २०१२-१३.
१०. विविध शासन परिपत्रक, कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११. शेतकरी मासिक. ग्रामीण विकासाच्या योजना, शेतकरी मासिक ऑगस्ट २०१०